# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

---

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

### मेट्रो रेल्वे मार्गाजवळ पतंग उडवू नये

### नायलॉन मांजाचा वापर करू नये



नागपूर : महा मेट्रो नागपूरच्या प्रवासी सेवा सकाळी ६ ते रात्री १० वाजता उपलब्ध आहे. महा मेट्रोच्या नागपूर मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत ऑरेंज लाईन मेट्रो स्टेशन आणि पुढे मिहान डेपो पर्यंत तसेच ऍक्वा लाईन मार्गावर सिताबर्डी इंटरचेंज ते लोकमान्य नगर आणि पुढे हिंगणा डेपो पर्यंत मेट्रो ट्रेनचे संचालन सुरु असते. मेट्रो ट्रेनचे संचालन २५००० वोल्ट विद्युत प्रवाहाच्या माध्यमाने होतो. ट्रेनच्या संचालनाकरिता विद्युत प्रवाह होतो व पतंग किवा मांजा या विद्युत तारांमध्ये अडकल्याने दुर्घटना घडू शकते. संक्रांत जवळ आल्याने शहरात पतंग उडवण्याचे प्रमाण वाढणार असून यातुन उद्भवणाऱ्या प्रश्नांबद्दल नागपूर मेट्रो सर्वसामान्य जनतेला सचेत करण्याचा प्रयत्न करीत आहे.

मेट्रो मार्गिके जवळ पतंग उडवणे तर टाळायलाच हवं पण या शिवाय, पतंग उडवताना नायलॉन मांजाच्या वापरामुळे होणाऱ्या संभाव्य धोक्या बद्दल देखील नागपूर मेट्रो नागपूरकरांना सतर्क करू इच्छितो. नायलॉन मांजा पासून होणाऱ्या अपघातांबद्दल आपण या आधी ऐकले आहे. म्हणूनच महा मेट्रो तर्फे नागपूरकरांना अनुरोध आहे कि त्यांनी केवळ मेट्रो रेल मार्गाजवळ पतंगबाजी करू नये, तर नायलॉन मांजाचा वापर देखील टाळावा. या सर्व मुद्द्यांवर सर्व सामान्य जनतेत जनजागृती करण्या करता महा मेट्रो नागपूरने शहर पोलीस आणि स्थानिक महाविद्यालयसोबत कार्यक्रमाचे आयोजन केले. या करता विशेषत्वाने पथ नात्याचे आयोजन मेट्रो भवन आणि सीताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशन येथे करण्यात आले.

मेट्रो रेल मार्गाजवळ पतंगबाजी केल्याने मांजा ओव्हर हेड इक्विपेन्ट मध्ये फसून मेट्रो ट्रेन चे संचालन प्रभावित होऊ शकते. या सर्व बाबींचा विचार करत सर्व नागरिकांना अनुरोध केला जातो कि त्यांनी न केवळ मेट्रो रेल मार्गाजवळ पतंगबाजी करू नये पण सोबतच नायलॉन मांजाचा वापर देखील टाळावा.